शिवसेना

!! श्री !!

खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३९०/१०/१०/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# शहरातील नियोजित पुतळयाचा प्रश्न त्वरीत मार्गी लावा
# खासदार चंद्रकांत खैरे यांचे महापौरासह आयुक्तांना सुचना

**संभाजीनगर ( ता.१८ ) :** स्मार्ट सिटी मध्ये शहरातील विविध महत्वाचे चौक, महापुरुषांचे पुतळे, स्मारके हे शहराच्या सुशोभिकरणात भर पाडणारे असुन याबाबत मंजुर झालेले नियोजित पुतळयाचा प्रश्न त्वरीत मार्गी लावण्याची सुचना शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी महापौर त्र्यंबक तुपे, महानगरपालिका आयुक्त डॉ. प्रकाश महाजन यांच्याकडे निवदेनाव्दारे केली. या सर्व प्रकरणनी एका जबाबदार अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन शासन दरबारी पाठपुरावा करावा.

शहरातील विविध समाजघटकांनी याबाबत अनेकदा खंत व्यक्त केली असुन महत्वाच्या मुद्दयाला दुर्लक्ष व फाटा दिला जाऊ नये, अतिशय जलद पध्दतीने या प्रकरणाला पाठपुरावा करुन पुढील ठिकाणी नियोजित पुतळयांच्या कामाला गती द्यावी. (१) महात्मा बसवेश्वर (स्वामी विवेकानंद उद्यान एन-१२), (२) महाराणा प्रताप (कॅनॉट प्लेस उद्यान सिडको), (३) सावित्रीबाई फुले व महात्मा फुले (औरंगपुरा, जि.प. जवळ पुतळा बदल करणे), (४) जीवा महाले (छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय, सुभेदारी विश्रामगृहाजवळ), (५) छत्रपती शिवाजी महाराज व धर्मवीर संभाजी महाराज (मराठवाडा मुक्तीसंग्राम संग्रालय, सिध्दार्थ उद्यान) (६) शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्मारक (अमरप्रित चौक, जालना रोड)

अशा विविध ठिकाणी महानगरपालिकेने सर्वसाधारण सभेत ठराव मंजुर केले आहे तसेच शहरातील मध्यवर्ती भागात शहागंज येथे भारताचे जनक लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांचा पूर्णाकृती पुतळा व चमन सुशोभिकरणासाठी खासदार निधीतुन ४० लाख रुपये निधी उपलब्ध करुन दिला. संबंधित निधी महानगरपालिकेला प्राप्त ही झाला, याच परिसरात हातगाड्या, रिक्षा स्टॅण्ड, चपला बुटाची दुकाने थाटली आहे, यासर्व बाबींचा महापालिके गांभीर्याने विचार करावा, या निष्काळाजी पडसाद महानगरपालिका कामकाजावर पडत आहे, शिवसेनाप्रमुखांच्या स्मारकांचे काम ही मराठी जनतेच्या व शिवसैनिकांच्या अत्यंत जिव्हाळाचा विषय आहे,राज्यात अनेक ठिकाणी ठराव ही पास नसतांना स्मारके, पुतळे उभारले जात आहे, या बाबत जबाबदार लोकप्रतिनिधी व आयुक्त म्हणुन आपण निश्चतपणे तत्परता दाखवाल अशी अपेक्षा ही शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी व्यक्त केली.

**सोबत निवेदन जोडले आहे.**

**प्रसिध्दी प्रमुख**

**गणेश वाघ/मनोज वडगावकर**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , ganeshwagh4400@gmail.com manojwadgaonakar@gmail.com

8484066606/9604384400/8983560831